म. ग्रं. सं. ठाणें
विषय काव्य
सं. क्र. 2026



REFBK-0007264
REFBK-0007264

# माझीं भावगीतं

बाबूराव गोखले

॥ श्री व्यंकटेश प्रसन्न ॥

# माझीं भावगीतें

[ स्वर-रचनेसह ]

मेसर्स- ठाकूर आणि कंपनी लि.
सीताबर्डी, नागपूर
REFBK-0007264

बाबुराव गोखले

गणेश-चतुर्थी

पहिली आवृत्ति १९४९ किंमत २ रुपये

*

—प्र का श क—
बा बु रा व गो ख ले
श्र म — वि श्रा म
४०३/२ सदाशिव, पुणें २.

*

कु ल क र्णी ग्रं था गा र
१८६ शनिवार, पुणें नं. २.

*

सर्व हक्क कवि बाबुराव गोखले यांच्या स्वाधीन.

मुखपृष्ठावरील व आंतील चित्रें – र. शं. मुळगांवकर

*

—मु द्र क—
न. वि. स र दे श पां डे
आ द र्श मु द्र णा ल य,
३९५/५ सदाशिव, पुणें २.

*



कवि : बाबुराव गोखले

★

— ती. काका आणि सौ. कमळुताई,
" माझीं भावगीतें " तुम्हीं वाचीत
नाहीं म्हणून तुम्हांलाच अर्पण —
— बाबू

# जरा इकडे कान करा—

— माझ्या भावगीतांसंबंधीं मला तुम्हांला कांहीं सांगायचं आहे.

—' कन्यादान प्रसंगींचे अश्रू आनंदाचे असतात कीं दुःखाचे असतात हें सांगणं कठिण असतं ' म्हणतात. तशीच कांहींशी माझी आज स्थिति झाली आहे.

—' माझीं भाव–गीतें ' रेकॉर्ड्सवरून, रेडिओंतून, काव्य-गायनाच्या कार्यक्रमांतून, मासिकांतून आपण ऐकलींत, वाचलींत आणि त्यांच्यावर प्रेम केलंत, म्हणूनच आज तीं संग्रह-रूपानं आपल्यापुढं ठेवण्याचं मी धाडस करीत आहें.

—' बाबुराव गोखल्यांचीं भावगीतें गायिलीं गेलीं म्हणजेच बरीं ' लागतात ' किंबहुना, तीं गाण्यासाठींच लिहिलेलीं असतात ' असं म्हणणारा एक वर्ग आहे. म्हणून ' माझीं भावगीतें ' वाचलीं गेलीं म्हणजेहि बरीं ' लागावींत ' हाहि, हा भावगीतसंग्रह आपल्यापुढं ठेवण्यांत एक हेतु आहे.

—' वारा फोफावला ', या माझ्या पहिल्या भावगीत संग्रहाच्या प्रस्तावनेंत, ' भावगीतांकडे रसिक आतां एका विवक्षित अपेक्षेनं पहात असून भावगीतकारांची जबाबदारी वाढली आहे हें निर्विवाद, ' असं मी म्हटल्याचं विसरलों

नाहीं. इतकंच नव्हे तर प्रत्येक भावगीत, त्याचा प्रत्येक शब्द लिहितांना ‘ त्या जबाबदारी ’ विषयीं मी जागरूक असतों हें मी तुम्हांला जातां जातां सांगूं इच्छितों.

—हें बघा, तुमच्या अपेक्षेशीं मी कधीं बेइमान होणार नाहीं, पण उपेक्षेबद्दल मात्र मला वाईट वाटेल. मात्र ‘ टीकाकार खाटिक नसावा तर तो शस्त्रक्रिया करणारा डॉक्टर असावा ’, या दृष्टीनं तुम्ही माझे खरेखुरे टीकाकार व्हा.

—आतां अगदीं खाजगी बरं का. कान आणखी जवळ करा. ‘ एकदां ऐकलें वा वाचलें असतां ज्या गीताचा अर्थ कळतो तें गीत ’ असं एक गणित मी माझ्या मनाशीं ठरवून टाकलं आहे. आचार्य अत्रे मानतात त्या ‘ शब्दसंगीता ’ चा मी भोक्ता आहें. ‘ शब्दसंगीत हा भावगीताचा आत्मा आहे, ’ आणि म्हणूनच सुबोध, संगीतमय शब्दांत आणि सरळ रचनेंत ( Direct construction ) भावगीतें गुंफण्याचा माझा प्रयत्न असतो.

—झालं माझं सांगून. आतां कान दूर केलात तरी हरकत नाहीं.

—‘ माझीं भाव-गीतें ’ यथायोग्य तऱ्हेनें पुढें आणणारे जय–विजय काव्यगायक वाटवे व जी. एन्. जोशी यांचे आभार मानणं शब्दातीत आहे.

—प्रसिद्ध गायक-गायिकांनीं माझ्या भावगीतांना योग्य

भावनांचा आणि सुरांचा साज चढवला. कै. मा. विनायक, वसंतराव जोगळेकर, शंकरराव तुंगे आणि अच्युतराव रानडे या प्रसिद्ध दिग्दर्शकांनीं 'माझीं भावगीतें' चित्रीकरणानं सजीव करून मला एका नव्या प्रांगणांत आणून सोडलं. मशारनिल्हे मेहेरबानांच्या माझ्यावरच्या मेहेरबानीचा कर्जबाजारीपणा या जन्मांत तरी माझ्या हातून फिटणं शक्य नाहीं.

—'जागा भाड्यानें देणें आहे' बोलपटांतील माझी पांच पद्यें, 'गरिबांचें राज्य' या बोलपटांतील माझीं पद्यें, 'तिनिसांज टळल्यावरी', 'तुझंमाझं प्रेम जुळलं' हीं भावगीतें छापण्यास मला परवानगी दिल्याबद्दल मकरंद फिल्म्स्, अशोक पिक्चर्स, मयूर पिक्चर्स, एस्. ए. कन्सर्न्स या संस्थांचा मी अत्यंत आभारी आहें.

--या संग्रहाचा 'बोलविता धनी' पंडितराव कुलकर्णी मुखपृष्ठाचे मालक मुळगांवकर, माझ्या गीतांना सुबक मुद्रण-कोंदण बसवणारे आदर्श मुद्रणालयाचे मालक आबासाहेब सरदेशपांडे यांचे परिश्रम या कामीं खर्ची पडले नसते तर हा तुमच्या 'कानीं लागण्याचा' प्रसंग येताच ना.
--हें सारं झालं तरी एक मात्र खरं कीं, 'रसिकहो ! तुम्ही माझ्या भावगीतांवर प्रेम करतां म्हणून तर हा सारा फापटपसारा. नाहींपेक्षां कुठला मी, न् कुठलीं 'माझीं भावगीतें ?'

श्रम-विश्राम,
४०३।२ सदाशिव, पुणें २. } बाबुराव गोखले

## आगामी प्रकाशनें

१ आजीची लेखणी
श्रीमती सी. भा. प.

२ आदर्श आर्या
श्रीमती गोदूबाई जोशी



## प्रेम-भाव

भावगीत क्रम—

| | | | |
|---|---|---|---|
| १ | माहेरचा समोर गांव | ... | ११ |
| २ | दारिंच्या देवळींत | ... | १२ |
| ३ | निरांजन पडलें तबकांत | ... | १३ |
| ४ | नभोवाणी-गायिकेस | ... | १५ |
| ५ | कां नाहीं हसलां नुसतें? | ... | १६ |
| ६ | कमरेला पदर खोंचुन | ... | १७ |
| ७ | हलके हलके चाल राधे | ... | १८ |
| ८ | ब्रिजलाला रे पाहियलें | ... | १९ |
| ९ | घागरीवर घागरी | ... | २० |
| १० | तुझंमाझं प्रेम जुळलं | ... | २१ |
| ११ | तिनिसांज टळल्यावरी | ... | २२ |
| १२ | विगिविगी मळ्यामंदी | ... | २३ |
| १३ | तिचं पत्र | ... | २४ |
| १४ | मोडेनहि परंतु— | ... | २५ |
| १५ | प्रेम हें आंधळें असतें | ... | २६ |

## माहेरचा समोर गांव : १

माहेरचा समोर गांव
सारंगा रं हाकार नाव ॥ ध्रु० ॥

नारळीच्या झावळांत
माहेर माझं हांकेवरतं
येऊनि आई आगरांत
ओवाळुन टाकील भात
तिच्या कुशीमंदी
घेइन धाव १

गणगोत जमल् गांवचं
कौतुक करतिल दोघांचं
मलाच म्हणतिल,
‘ घे पोरि नांव ’ २

कोजागिरि आज कोजागिरी
लंगर टाकूं माहेरच्या बंदरीं
समिंदराचा तुला सराव ३

चाल व गायक : बाबुराव गोखले

## दारिंच्या देवळींत : २

दारिंच्या देवळींत जळो पणती सारी रात
प्रगटले न अजुन कांत अंधकार अंतरांत ॥ ध्रु० ॥

रात्रंदिन वाट बघत घालुनी पळी कडींत
येइना अजून मूर्त माघारीं मंदिरांत १

रांगोळी अंगणांत अश्रुबिंदु घालतात
गाल, ओंठ भिजुन जात ओघळत्या काजळांत २

वृंदावनिं सांजवात निश्वासें विझुन जात
तुळशिच्या प्रदक्षिणांत चर्र होत काळजांत ३

नाथांची झाली साथ फक्त सात पावलात
आज ऊर-तारु फुटत विरहाच्या वादळांत ४

कुंकवाच्या कोयरींत रोज थबकतोहि हात
वैरी जें जें न चिंति तें तें ये मनांत ५

चाल : बाबुराव गोखले गायक : वाटवे

## निरांजन पडलें तबकांत : ३

निरांजन पडलें तबकांत
बाळ तर गेला समरांत ॥ ध्रु० ॥

क्षणाआधिं तर तेवत होती
पूजेमधली प्रशांत ज्योती
दृष्ट कुणाची लागुन कां ? ती
विझली निमिषांत १

ओवाळुनही झाली नव्हती
तोंच उधळली मंगल आरती
कां ? पडली बाळाची आहुती
संगर-यज्ञांत २

रागरागिणी आळवुन झाली
आयुष्याची कविता सरली
दुर्दैवानें माता बसली
भैरवी आळवित ३

परक्यांना करण्यास्तव तर्पण
फूल पोटिचें केलें अर्पण
निर्माल्याला तुडवुं नका पण
सोडा गंगेंत ४

आतां मज द्या शव तरि आणुनी
झाकिन तें मी ऊर फाडुनी
भडाग्नि शोकानलें देउनी
निजेन सरणांत ५

चाल : बाबुराव गोखले गायक : वाटवे

## नभोवाणी—गायिकेस : ४

भावगीत ऐकिलें जें तुवां ऽ गायिलें
कां ? तुझ्या मनांतलें द्वंद्व त्यांत सांठलें ॥ ध्रु० ॥

अस्ताइस शांतता
अंतऱ्यांत आर्तता
मिळवणींत खिन्नता
समेवरी कशामुळें ? गीत तें पुन्हां खुले १

शब्द अर्थ सुचविती
सूर दर्द दाविती
भाव मुळिं न झांकिती
कां ? तुझ्या स्मृतींतलें भग्न-स्वप्न रेखिलें २

गीत रागरागिणी
तुझिच ऐकतांक्षणीं
भासलीस विरहिणी
एकलेपणांतलें विरह-गीत वाटलें ३

मजासि आज भासलें
सम-विरही भेटले
ना कळे कशामुळें ?
मन्मनास जिंकिलें जरि तुला न पाहिलें ४

चाल : बाबुराव गोखले गायक : वाटवे

## कां नाहीं हंसलां नुसते ? : ५

कां नाहीं हंसलां नुसते ?
मी नाहीं म्हटलें नसतें
जडलेंहि कदाचित असतें
आपुलेंच अवाचित नातें ॥ ध्रु०॥
सज्ञांत उभी मी होतें
रस्त्यांत पाहिलें तूंतें
डोळ्यांनीं सांगत होतें
कां नाहीं ओळखिलें तें १
मशगूल तुझें मन होतें
कीर्तीला जिंकायातें
परि तुजला जिंकायातें
अन्तरीं झुरत मी होतें २
मी होउन पुसलें असतें
तूं नाहीं म्हटलें असतें
त्या पराभवाचें पातें
काळजांत घुसलें असतें ३
तूं वरिलें दुसऱ्या स्त्रीतें
मज दिलें दुज्या पुरुषातें
दुःखांत सुख परी इतुकें
हें कुणास कळलें नव्हतें ४

चाल व गायक : बाबुराव गोखले

## कमरेला पदर खोंचुन : ६

कमरेला पदर खोंचुन
ये मोटवणावर धावुन ॥ ध्रु० ॥

जिवाभावाची तूं ग मैत्रिण
तुझ्याविना सुनी ही मोट्‌वण १

करूं उभ्या पिकाची राखण
गरगरां फिरवुनी गोफण २

तुझ्या उभार देहाची ठेवण
तुडविते जिवाचं कुंपण ३

मार्गसरांत लावून लगिन
माझ्या मळ्याची होशिल माल्‌किण ४

चाल व गायक : बाबुराव गोखले

## हलके हलके चाल राधे ! : ७

हलके हलके चाल राधे
घागर डोईला ॥ ध्रु० ॥
लागुं नको ग लागुं नको
कान्ह्याच्या नादाला
फुटेल घागर त्या नादांनीं
काय सांगशिल नवऱ्याला १
जाउं नको ग जाउं नको
कुंजाच्या वाटेला
वृंदावनिंच्या आडवाटा
सामिल मेल्या कान्ह्याला २
ऐकुं नको ग ऐकुं नको
कान्ह्याच्या मुरलीला
या मुरलीवर आजवर त्यांनीं
कैक भुलविल्या व्रजबाला ३
विसरुं नको ग विसरुं नको
प्रीतीच्या संसारां
प्रीति-फुलांचा साज वेंच ग
पतिदेवाच्या पूजेला ४

चाल व गायक : बाबुराव गोखले

## ब्रिजलाला रे पाहियलें : ८

ब्रिजलाला रे पाहियलें
मन रंगलें वेडावलें
घरिं काम-धाम राहियलें ॥ ध्रु० ॥

हिणविति जरि मजला व्रजबाला
धाक कुणाचा ना बाळगिला
कुंजांत रे धावुन आलें १

अचुक वळलीं पाऊलें
मी लाजलाजुन गेलें
नखशिखांत रोमांच फुलले २

अधरीं वाजिव मधु मुरली
राधा-बाला आतुरली
मुरलीविना रे गोकुळ सारे व्याकुळलें ३

चाल : बाबुराव गोखले गायक : बबनराव नावडीकर

## घागरिवर घागरी : १

घागरिवर घागरी
कशाला भरिशी नंदाघरीं ? ॥ ध्रु० ॥
यमुनेवरती पाणी भरतां
कुणां पाहण्या नजर फिरे
ऐन दुपारीं मागें वळतां
कुणां शोधण्या जीव झुरे
होइल फजिती पुरी
रिकामी घागर कमरेवरी १
नंदाघरच्या गाय-वासरां
सांजसकाळीं दाविशि पाणी
कृष्ण-यशोदा माय-लेकरां
गाउन दाविशि मंजुळ गाणीं
घेशी डोईवरी
कशाला परक्याची चाकरी २
उभा राहुनी तुझ्या पाठिवर
कोण करी दुभत्याची चोरी
माय यशोदा येतां भरभर
कुणा लपविशी मागिल दारीं
मोहविते ना खरी
तुला ग कान्ह्याची बासरी ३

चाल : बाबुराव गोखले गायक : बबनराव नावडीकर

## तुझंमाझं प्रेम जुळलं : १०

तुझं-माझं प्रेम जुळलं
कोजागिरिला नातं जडलं ॥ ध्रु० ॥

संध्याकाळीं ओळख नव्हती
मध्यरात्रिला फुलली प्रीती
फक्त चंद्रानी पाहिलं १

मंदिराच्या गाभाऱ्यांत
प्रीत-निरांजन तेवत होतं
एकमेकां ओवाळिलं २

स्वैर विहरतां रात्र संपली
प्रीती-गीतें तरि ना सरलीं
चंद्र लाजला काळं केलं ३

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. ८२४९
ग्रंथ शाखा (स्थळ प्रत)

चाल : व्ही. जी. भाटकर गायिका : शान्ता आपटे

## तिनिसांज टळल्यावरी : ११

तिनिसांज टळल्यावरी
वाट तुझी पाहिन दारीं ॥ ध्रु० ॥

करुन सारी दिवेलागणी
राहिन राया उभी अंगणीं
बोलुं नको तुज पाहिल् कुणी
परक्यांची मज भीति पुरी १

जा माझ्या रे दारावरुनि
नजरेचा नजराणा देऊनी
थांबुं नको त्याच क्षणीं
परतुन जा जा माघारीं २

फुलेल जेव्हां रात-राणी
चोरपावलीं येशिल अंगणीं
येऊं नको वेड्यावाणी
रातींच्या भलत्या प्रहरीं ३

चाल : व्ही. जी. भाटकर गायिका : शांता आपटे

## बिगिबिगि मळ्यामंदी : १२

बिगीबिगी मळ्यामंदी जाऊं जरा ग
सांज सरल् रात पडल् मैतरणी ग ॥ ध्रु० ॥

आंबराई मोहरली कशी माळावरी
पिरतीचं पीक उभं तुझ्या गालावरी
पुसूं नग आठवणी मळ्यांतल्या ग १

कणसाच्या दाण्यावानी दांत तुझं रानी
चिमणीच्या दातांनीं टिपायचं मनीं
लपुन् छपुन् कुणी बघल् तुला मला ग २

बघ आली औंदाची लगिन सराई
माझ्या तुझ्या संसाराची फुलवुं या सराई
भरल्या घरिं नांदावी माझ्या लक्ष्मी ग
पाहूं नग सपन् सरल् नजर पडल् ग ३

चाल व गायक : वाटवे

## तिचं पत्र : १३

लाजलाजुनी सांग कुणाला पत्र आज लिहिशी ?
मधेंच थांबुनि फिरफिरुनी कां ? टाक अधरिं धरिशी १

मुक्या दिलाचे तुझ्या घ्यावया हळूंच कानोसे
गौर मनगटीं तुझ्या वाटतें बिल्वर व्हावेंसें २

' हृदय-धनाची चोरी अवचित कुणी करुनि गेला '
कुवारपणच्या विनयें तें कां लिहिशी आईला ? ३

चिरंजीव करण्यास्तव प्रीती पत्ररूप आज
प्रीत-संगमीं भवितव्याचा बांधिशि कां ताज ? ४

× × ×

लिहितां लिहितां कां कुस्करली क्षणांत हास्य-कळी
पुढच्या ओळी तुडवणार कां त्याला पायदळीं ५

उडतिल शकलें होउनि त्याची प्रीत-मूर्ति भंग
शपथ गळ्याची करूं नको तो लिफाफाच बंद ६

## मोडेनही परंतु— : १४

‘ आयुष्य ही लढाई ’ मी हारणार नाहीं
मोडेनही परंतु मी वाकणार नाहीं ॥ ध्रु० ॥

माझ्याच याल दारीं कुणि प्रीतिचे भिकारी
मी भीक कुणालाही परि घालणार नाहीं १

खेळेन प्रीत-खेळ जावो कितीहि जीव
जिंकेन प्रीति-हार मी हारणार नाहीं २

बरसात चांदण्याची लाभे इथें चकोरा
परि चांदणेंहि माझें कधिं संपणार नाहीं ३

करितां शिकार माझी होती शिकारि ठार
सौगंध कस्तुरीचा मिळणार कुणा नाहीं ४

काव्य
20826

## प्रेम हें आंधळें असतें : १५

प्रेम हें आंधळें असतें
हें मजला माहित नव्हतें
ज्या क्षणीं उमगलें असतें
त्या क्षणीं परतलें असतें ॥ ध्रु० ॥

पाहुनी तुला ओझरतें
एकरूप झालें चित्तें
सोडुनी घरादारातें
जोडिलें तुझ्याशीं नातें १

पाषाणा निमिषार्धीतें
मज दिलेंस दैवां हातें
कां अंतर इतुकें असतें ?
अन्तरांत अन् स्वरूपातें २

एकलीच मी एकांतें
भैरवी आज आळवितें
हो उजाड जीवन पुरतें
दुःखाच्या झंझावातें ३

प्रेमाचें नांवच नुसतें
उपभोग हवा पुरुषातें
ज्या क्षणीं उमगलें मज तें
त्या क्षणीं माझि मी नव्हतें ४

चाल : बाबुराव गोखले

## म्हणुं नका महात्मा गेला– : १६

म्हणुं नका महात्मा गेला
मरणांत चिरंजिव झाला
जरि प्राण कुडींतुन गेला
मृत्युंजय आत्मा ठरला ॥ ध्रु० ॥

तो चित्रगुप्तही चुकला
यमधर्मा प्रथमच फसला
घातला फांस देहाला
परि आत्मा त्यांतुन सुटला १

जागेपणिं नव्हती त्याला
स्वस्थता मुळिं शपथेला
कुणि उठवुं नका हो त्याला
आडवा जरासा झाला २

शस्त्रांना नाहीं भ्याला
निःशस्त्र एकटा लढला
जरि स्वतः भिकारी असला
तो राज्य-घडविता ठरला ३

खिस्ताला अन् बुद्धाला
तो सांगायाला गेला
सत्य अन् अहिंसेचा
जळुनि मी दीप उजळविला ४

मृत्यु ये तपशीलाला
मृत्यु ना कधिं तत्त्वाला
मृत्यु ये जरि देहाला
मृत्यु ना माहात्म्याला ५

बाबुराव गोखले

## कशाला येतां नेताजी ? १७

कशाला येतां नेताजी ?
खड्ग का म्यानाला राजी ? ॥ ध्रु० ॥

रक्तचटोच्या वाघनखाला
स्वतंत्र गरुडाच्या पंखाला
हवी कशाला पुन्हां शृंखला ?
बोला रणगाजी १

अशोक, नेपोलियन्, शिवाजी,
राम, सिकंदर नुरले आजी
आतां उरले दुसरे बाजी
कोणी सूर्याजी २

शिस्त नि शस्त्रांचें हालाहल
कठिण पचाया, आम्ही दुर्बल
पक्षापक्षांचा कोलाहल
या राष्ट्रामाजीं ३

जिंका आम्हां बनून राजा
फोडा अन् दिल्ली-दरवाजा
आम्ही नुसते म्हणतों " जा जा
रांडे राघोजी " ४

× × ×

. .

येणारच, तर मग येतांना–
चाळिस कोटी शस्त्रें आणा
धडाधडा मग पेटवूं रणां
शत्रूंच्या गंजी ५

चाळिस कोटी खड्गसलाम्या
घेत घेत राजाधिराज या
स्वतंत्र-भारत-दरबारीं या
या मग नेताजी ६

डिसेंबर १९४६

## एकदां जन्म घ्याच गडकरी : १८

पडला आहे घाला अपुल्या वाङ्मय-मालावरी
एकदां जन्म घ्याच गडकरी ॥ ध्रु० ॥

काव्यांचे आपण अभेद्य तट बांधिले
नाट्याचे भक्कम बुरुज तुम्हीं रोंविले
वर विडंबनाचें निशाण फडफडविलें
साहित्याचे उभारिले गड आपण प्रतिभा-करीं
डागल्या तोफा कुणि त्यावरी १

जो आपण येथें उघड्यावर टाकला
माझाच माल तो, जो तो म्हणुं लागला
वादंग त्यावरी खडाजंगि माजला
प्रकाशकांचे पंडे अडविति अवचित रस्त्यावरी
चढतिही कोर्टाची पायरी २

तव नाट्य-संपदा कोणि इथें चोरती
काव्यांचे मुडदे सताड हे पाडिती
हे बाळकरामा! नीति तुझी काढती
मालापेक्षां असे सारखी दृष्टि उठावावरी
एकदां जन्म घ्याच गडकरी ३

## महाराष्ट्राचा मानकरी : १९

महाराष्ट्राचा मानकरी साधासुरता शेतकरी
जिमिनीची चाकरी सकाळदुपार हा करी
धनिण आणी भाकरी संगंसंगं करिति न्याहारी ॥ध्रु०॥

बंगाल देश कंगाल होऊनी आला त्याच्या दारीं
'अन्न-वस्त्र द्या' म्हणूं लागला दावुन लाचारी १

अंगावरचं कुडतं काढुन शेतकऱ्यांनीं दिलं
उरलीसुरली अर्धी भाकर दिलीहि धनिणीनं २

× × ×

बंगाल्यांच्या दुर्दैवाची सांगुं लागला दुःख-कहाणी
सांगत असतां खळलें न मुळीं लोचनिंचें पाणी ३

'जगण्यासाठीं कुमारिका किति टाकिति शील गहाण
कामांध अशा नरपशूंची नाहिं तिथें मुळिं वाण' ४

भणाणलें कानशील पाहुन शील-भ्रष्ट नारी
सळाळलें मन्‌गटीं रक्त अन् उठला शेतकरी ५

कामांधापासून सोडवुन निष्पापी बाला
बहीण सख्खी मानुनि आणिली अपुल्या देशाला ६

× × ×

' अन्नावांचुन आटले पान्हे सोडि बालकां आई
पळवायाला जीव तान्हे मृत्यु धाव घेई ' ७

मृत्यूला थोपवुनी शेतकऱ्यांनीं धरिलें
धनिणीनें बालकास जीवनामृतां दिधलें ८

पोलादाच्या शरिरयष्टिनें खेळुनियां कुस्ती
अजिंक्यपद मिळविलें उतरुनी मृत्यूची मस्ती ९

× × ×

मृत्यू परवडला कायदा सुटला पण नाहीं
भूलोकींच्या यमदूतानें नेला बांधोनी १०

धाय धाय मग रडूं लागली धनीण माघारीं
बंगाली समजावुं लागला, ' दुःख अतां आवरी ' ११

' पूर्वींपासुन तुम्ही आम्ही आहों शेजारी
कळिकाळाचें नको तुला भय बहिणी जन्मभरी ' १२

× × ×

पहिली भाऊबीज साजरी केली तीनं
नेत्रींचें निरांजन ओवाळुन १३

पहिली ओवाळणी घातली बंगाल्यानं
रक्ताचा कुंकुम कपाळीं लावुन १४

चाल : बाबुराव गोखले

## उर्मिला : २०

टक लावुनि वाट बघत वेडि उर्मिला
रामासह पति गेले सोडुनी मला ॥ ध्रु० ॥

माय सुनी नगरि सुनी प्रभुपदांविणें
ह्यांच्याविण मीहि सुनी जगुं कसें जिणें १

पुत्र-धर्म दोघांनीं जरिहि पाळिला
घरच्या घरिं वनवासहि मजसि घडविला २

पति-सेवा नित्य तिथें करिल जानकी
अंतरलें दर्शनही मीच पातकी ३

चौदा वर्षांत नाहिं रूप पाहिलें
पापणिच्या पालखिनीं अश्रु वाहिले ४

गेल्या जन्मांत काय पातक घडलें
या जन्मीं भोगाया मज उपेक्षिलें ५

देवा ! तुज घालि आण " वेडि उर्मिला "
सांग कधीं येतिल ते मजसि न्यायला ६



## विनोद-भाव

## भावगीत क्रम—


२१ : नटीची वधूपरीक्षा ... ... ३७

२२ : पत्नीचा संप ... ... ४१

२३ : नटींची नोटीस ... ... ४३

२४ : उतावळा नवरा ... ... ४४

२५ : प्लेग आणि सुरा ... ... ४५

## नटीची वधूपरीक्षा : २१

निवेदक– दिग्दर्शक तो होता एका
सिने-कंपनीचा
करूं नये पण विचार केला
त्यानें लग्नाचा १

चिरंजीव सौभाग्यकांक्षिणी
सांगुन नटि आली
राक्षसवेळीं वधूपरीक्षा
बारमध्यें झाली २

× × ×

दिग्दर्शक– बाळ तुझें ग
नांव काय ?
निवेदक– तो प्रश्न पुसे पहिला
नटी– पाळण्यांतलें विठी परंतु
पडद्यावर लयला ३

दिग्दर्शक– अंदाजानें किती असावें
सध्यां वय तुमचें ?
नटी– पडद्यावरती बालनटी मी
वय चौतीसाचें ४

दिग्दर्शक– कोणकोण आहेत तुम्हांला
नात्यागोत्याची ?
नटी– कोणी नाहीं, एकच मुलगी
चवथ्या लग्नाची ५
दिग्दर्शक– सकच्छ अथवा विकच्छ यांतिल
कुठलें आवडतें ?
नटी– शूटिंगांतिल प्रवेशावरी
अवलंबुन असतें ६
दिग्दर्शक– माझे सगळे प्रश्न तुम्हांला
विचारून झाले
आतां तुम्ही प्रश्न विचारा
कांहीं जर असले ७
नटी– आतां सांगा पितां उठोनी
दूध किती शेर ?
दिग्दर्शक– सकाळ संध्याकाळ झोंकतों
विलायती बीर ८
नटी– मित्रमैत्रिणी एकूण किती
आहेत तुम्हांला ?
दिग्दर्शक– सर्व नायिका मैत्रिणि माझ्या
मित्र न कोणि मला ९

नटी- शपथ वहा तर एक-पत्निच्या
व्रतास पाळीन
दिग्दर्शक- दुसरी ऑफर येईतोंवर
तुला न टाकीन १०

नटी- अंदाजानें किती असावी
तुमची इस्टेट ?
दिग्दर्शक- तुझ्या पगारावरीच माझें
अवलंबुन पोट ११

नटी- वधू म्हणुन मी किती आपणां
मोजावा हुंडा ?
दिग्दर्शक- फायनान्सर द्या गांठुन कोणां
घालुनिया गंडा १२

× × ×

निवेदक- अशा तऱ्हेनें स्थळें तयांचीं
दोघांना पटलीं
एका क्षेत्रीं परस्परांशीं
लग्न-बद्ध झालीं १३

जीवन-युद्धामध्यें उघडिला
दोघांनीं फ्रंट
दो महिन्यांनीं झाला मुलगा
हाच खरा स्टंट १४

चाल : बाबुराव गोखले
गायक : बाबुराव गोखले
आशा गाडगीळ
दत्ता डावजेकर

## पत्नीचा संप ! : २२

एके दिवशीं पुकारिला अन् पत्नीनें संप
चूल मूल अन् मीहि हदरलों हो धरणीकंप १

हातानें मग करूं लागलों काम चुलीवरलें
हात पोळले, हात दाखवुन अवलक्षण झालें २

असो चुलीचें काय एवढें राहिलों उपाशी
नशिबीं आलें, मूल घ्यायचें, प्रथमच त्या दिवशीं ३

"मुलें जणुं फुलें" मारे चाले कल्पना कवींची
फुलें कसलीं हीं वैरी शिरीं सातां-जन्माचीं ४

× × ×

पतिदेवांनो ! ऐका यादी तिच्या मागण्यांची
उगीच नव्हती सौभाग्यवती कच्च्या नवऱ्याची ५

"प्रेम-पगारामध्यें मिळावी बढती दुपटीनें
महिन्यानें तो नको, मिळावा रोजंदारीनें ६

रात्रपाळिचा पगार म्हणुनी सिगारेट सोडा
हातानें स्वयंपाक करावा, ज्या दिवशीं खाडा ७

तुमच्या साऱ्या पगारावरी माझि असो सत्ता
तोंड बंद, पाहिजे मुक्यानें महागाइ-भत्ता ८

× × ×

बजावली नोटीस तिच्यावर चोविस तासांची
रेशन केलें बंद, मागणी केली कपड्यांची ९

अश्रुवायु सोडला तिच्यावर काढुन बाप तिचा
परंतु झाला नामोद्धारहि त्याच्या व्याह्याचा १०

दुसऱ्या पत्नीच्या धमकीचा गोळिबार केला
झांशीवालीच्या धीरानें सहन तिनें केला ११

× × ×

"घरोघरीं मातिच्या चुली" अन् रात्रिं जशा विझती
तसेंच झालें. कसें ? सांगण्या हुकुम तिचा नाहीं १२

## नटींची नोटिस : २३

वेळिअवेळीं उठल्याबसल्या आम्हांवरि लिहितां
समजतां तरी कोण अम्हाला बरेच कीं दिसतां ? १
अमुच्याविषयीं उठवुन कंड्या कां खोट्यानाट्या
घरचें खाउन भाजतां तुम्ही लष्करच्या रोट्या २
आजन्माच्या कुमारिका अम्ही चालि कुणी नाहीं
नाहिं नाहिं तें लिहितां म्हणुनी खुर्चीवर बसुनी ? ३
दुसरें, तिसरें अथवा चवथें लग्न नटी करते
तुमच्या बापाचें सांगा ना त्यांत काय जातें ? ४
जातिभेद गाडून उतरवूं सनातनी तोरा
मुसलमान कां महार सुद्धां करूं अम्ही नवरा ५
करून सवरून भागल्यावरी देवपुजाहि करूं
सीता-तारा-मंदोदरिच्या वारसदार ठरूं ६
कळविण्यांत येतें कीं अमुच्या या नोटीशीनें
' धरा आवरून अतां लेखण्या मुकाट बोलानें ७

× × ×

पहा ! नाहिंतर, संघशक्तिनें उडवुं पुरा फज्जा
टाकुन तुमच्यावरतिं सहाव्या लग्नाचा बोजा ' ८

## उतावळा नवरा : २४

ती– उतावळा नवरा सजला
बांधुन बाशिंग गुडघ्याला
दुसऱ्या लग्नाचा
काळा बाजार मांडियला १

तो– लग्नाच्या बाजारीं
भाव येतसे नवऱ्याला
सोन्याचा व्यापारी
तुच्छ मानितो मोल्याला २

ती– लग्न नव्हे मुळिं सौदा
उच्चनीच ना भाव कुणा
प्रीतीच्या संसारीं
कोणी ना पुसे पैशाला ३

तो– जरि न तुला आवडला
खुश्शाल टाकुन दे त्याला

ती– टाकुं कशी नवऱ्याला ?
मूर्ख कायदा धांवुन येइल
तुमच्या हांकेला

चाल : व्ही. जी. भाटकर गायक : व्ही. जी. भाटकर, मंजू

## प्लेग आणि सुरा : २५

प्लेगाशीं जर गांठ पडुन मी मेलों ' गाठीनें '
पेठवार अन् नांवनिशीही छापुन येईल
परंतु पडतां बळी, सुऱ्याच्या अवचित हल्ल्यानें
' उत्तरभागीं एक ठार ' हें फक्त छापतील

\+ + +

असुर-सुरा ? छे ! सुर प्लेगाचा पावो नवसाला
' ग़ाठि ' एवढी खडिसाखर मी वाटिन प्लेगाला

पृ. २६ ते ३० माझीं ' लगीनघाई ' नाटकांतील पद्यें.

संगीत–दिग्दर्शक : बाबुराव गोखले.

„ ३१ ते ३५ माझीं ' गरिबांचें राज्य ' बोलपटांतील पद्यें.

संगीत–दिग्दर्शक : दादा चांदेकर.

„ ३६ ते ४० माझीं ' जागा भाड्यानें देणें आहे '
बोलपटांतील पद्यें.

संगीत – दिग्दर्शक : दत्ता डावजेकर.



नाट्य-भाव

भावगीत क्रम—


| | | | | |
|---|---|---|---|---|
| २६ : | घरकुल हें माझें | ... | ... | ४९ |
| २७ : | ध्येय आज गांठलें | ... | ... | ५० |
| २८ : | तव छंदें ब्रिजलाला | .... | .... | ५१ |
| २९ : | आस्ते कदम राणिसरकार | | ... | ५२ |
| ३० : | भाग्य संपलें | ... | ... | ५४ |

## घरकुल हें माझें : २६

घरकुल हें माझें मनोहर
दोघांचाही रोज चाले
भातुकलीचा खेळ बरोबर ॥ ध्रु० ॥

इवल्याशा या संसारांत
फुलवी प्रीती चांदरात
भाग्याचा संसार निरंतर १

प्रभा विलसो सौ-भाग्याची
दृष्ट लागो ना कुणाची
पांखर प्रीतीची आम्हांवर २

## ध्येय आज गाठलें : २७

लाख वेळ शोधिलें
ध्येय आज गांठलें
आज प्रीति-तारवा
नाखवां मिळे ॥ ध्रु० ॥

वणवण मी एकाकी
व्यर्थ धांवलें
नवजीवन यौवनिं या
आज लाभलें १

आशेच्या पूर्तीचें
स्वप्न पाहिलें
साकारुन ते आले
धुन्द जाहलें २

सौख्याच्या शिखरावर
मी विराजलें
मंगलमय नंदनवन
भूवरी आलें ३

## तव छंदें ब्रिजलाला : २८

तव छंदें ब्रिजलाला
आज गोकुळीं आली राधा-बाला ॥ ध्रु० ॥

गोपसख्यासह रास रचावा
वृंदावनिचा कुंज फुलावा
तव ऐकव रे मंजुळ पावा
अधिर जाहलें देवा पूजायाला १

यमुनातीरीं नंदकुमारा
हासत जाऊं चल परभारा
फुलबिन माझा भक्ति–फुलोरा
रूप सावळें लावी वेड जिवाला २

## आस्ते कदम राणिसरकार : २९

तो- आस्ते कदम राणिसरकार
आस्ते कदम चला सरकार
ती- राज्यामध्यें भरो न माझ्या
वेड्यांचा बाजार ॥ ध्रु० ॥

तो- लष्कर आपुल्या संसाराचें
खडें सदा राहाणार
ती- तुम्ही नुसत्या लष्करच्या का
भाकऱ्या बडविणार
तो- चेष्टा पुरे करा सरकार १

राजा-राणीच्या राज्याचा
पाळण्यांत परिवार
ती- परिवाराचा आपुल्या सांगा
खर्च कोण वाहाणार
तो- बोला जपुन जरा सरकार २

तूं गादीवर मी पायाशीं
' जी हुजूर ' करणार

ती- प्रीतीच्या राज्यांत राजसा
हुजुर मजुर-सरकार
तुम्ही हुकुम मला करणार ३

तो- संसारामधिं असतो नवरा
मानाचा सरदार
ती- पुरे आतां बरखास्त करा हा
स्वप्नांतिल दरबार
हुद्दा खतम् करिन सरदार
तो- आस्ते हुकुम करा सरकार ४

## भाग्य संपलें : ३०

आज बाई भाग्य संपलें ॥ ध्रु० ॥

प्रीत-पूजनास या
दृष्ट काय लागली ?
काव्य जीवनांतलें
आज संपलें १

दोन जीव आपुले
एकजीव जाहले
सांग कोणी विंधिलें
स्वप्न भंगलें २

चांद्रात संपली
काळरात पातली
एकलीच राहिलें
सौख्य संपलें ३



पट-भाव

## भावगीत क्रम—


| | | | |
|---|---|---|---|
| ३१ | होणार मी सुभाव | ... | ५७ |
| ३२ | पहिला माझा घास | ... | ५८ |
| ३३ | उभि कवाचि मोटेवरी | .... | ५९ |
| ३४ | निर्मळ आमुचं खेडेगांव | ... | ६० |
| ३५ | होणार आपुलं लगीन मार्गसरीं | .. | ६१ |
| ३६ | जागा मिळेल का शेजारीं ? | ... | ६२ |
| ३७ | रमवाया राधिकेला | ... | ६३ |
| ३८ | तुझ्या नि माझ्या संसारीं | ... | ६४ |
| ३९ | शुभमंगल झालें | ... | ६५ |
| ४० | मुशाफिरा रे | ... | ६६ |

## होणार मी सुभाष : ३१

होणार मी सुभाष
आई होइन मी सुभाष ॥ ध्रु० ॥
दूर दूर जाइन
देश देश जिंकिन
लढतिल ग शौर्यांनी
बाळ-शिपाई १
संगें लक्ष्मि-राणी
गाऊं लष्करी-गाणीं
इवल्याशा पलटणिची
घेऊं सलामी २
‘ चलो दिल्ली चलो दिल्ली ’
घोषणा करूं
दिल्लीच्या तख्तावर
वसविन आई ३
दुर्दैवानें खचलों मार्गीं
भेटूं आई तूं मी स्वर्गीं
मांडीवर घे, घे मग आई
बाळाच्या विजयाची गा अंगाई ४

गायिका : बेबी सुमन भाटे

## पहिला माझा घास : ३२

पहिला माझा घास ग
सूर्यदेवाला
सरजादेवाला ग
माझ्या देवाला १

दुसरा माझा घास ग
गांधीबाबाला
जागवीलं ऊठवीलं
साऱ्या देशाला २

तिसरा माझा घास ग
सुभाषबाबूला
स्वराज्यांतल्या ग
पहिल्या राजाला ३

चवथा माझा घास ग
नाना पाटलाला
शेतकऱ्यांच्या हांकेला ग
देव धांवला ४

गायिका : प्रमिला जाधव

## उभि कवाचि मोटंवरी : ३३

उभि कवाचि मोटंवरी
इरभळ मारित ललकारी
नजर धांवते भिरिभिरी || ध्रु० ||

पाटाचं पाणी झुळझुळतं
शिवार समदं थयथयतं
काहुर उठलं माझ्या उरीं १

माझ्या मोटेचीं बैलं घुटमळती
तुझ्या पावलाची चाहूल बघ घेती
लई रं पिरती तुझ्यावरी २

एकलीच मी नाहीं धनी
धन्यावांचुनी मोट सुनी
उगिच वाजते किराकिरी ३

गायिका : प्रमिला जाधव

## निर्मळ आमुचं खेडेगांव : ३४

निर्मळ आमुचं खेडेगांव
राव रंक ना भेद्भाव ॥ध्रु०॥

हिरवीं हिरवीं इथलीं शेतं
गरिबांच्या राज्याची दौलत
नाहीं दुसरी हांव १

खेडेगांवची राजा-राणी
मोटवणावर गाई गाणीं
भोळ्या जिवांचा भोळा भाव २

प्यारं आमुचं आम्हां झोपडं
नकोत तुमचं राजवाडं
गारिबीचा हाय आम्हां सराव ३

गरिबांच्या राज्यांत एकला
सावकार श्रीमंत जाहला
कली मातला देवा धांव ४

गायक : वाटवे
: मालती अष्टपुत्रे

## होणार आपुलं लगीन मार्गसरीं : ३५

होणार आपुलं लगीन मार्गसरीं ॥ ध्रु० ॥

भरजरीचा येइल बांधुन मंदिल डोईला
वीर माझा येइल खोंचुन लिंबु कट्यारीला
येणार सवारी बसून घोड्यावरी १

साडी हिरवी, चोळी हिरवी, चुडा भरीन हिरवा
हळुंच पाहिन बाशिंगांतुन डोळा करून तिरवा
भरणार कपाळीं तुझ्या नांवची चिरी २

झोंपडीचा राजवाडा करून राह्याचं
झोंपडींतून बसवूं राजा राज्य गरीबांचं
नांदावी लक्ष्मी आपुल्या भरल्या घरीं ३

गायिका : प्रमिला जाधव

## जागा मिळेल कां शेजारी ? : ३६

जागा मिळेल कां हो शेजारी ?
जागा मिळेल कां हो बाजारीं ?
शोधिल्या कितीतरी बागा
अन् घोड्याच्याही पागा
ह्या जिन्याखालती जागा
जागेविना आलीच लाचारी १

घ्या भाडें सर्व अगाऊ
पावती नका मुळिं देऊं
पागडी हवी ती देतो
धाडूं नका परंतु माघारीं २

सांभाळित मी मुलामुलींना होऊन तुमचा 'रामा'
धुणीं भांडिंही करिन अथवा ठेवा मज 'वरकामा'
पडतो तुमच्या मी पायां भिक्षा जागेची घाला ३

गायक : पंडितराव नगरकर.

## रमवाया राधिकेला : ३७

रमवाया राधिकेला ये सख्या नंदलाला ॥ ध्रु० ॥

सांज झाली गोकुळीं
तुझ्यावांचुनी सुचेना मुळीं
काहुर माझ्या उरीं दाटलें हुरहुर जीवाला १

साज फुलांचा तुजसि वाहुनी
ओवाळिन मी निरांजनानीं
जिवास माझ्या तुझ्या पुजेचा छंद हा लागला २

कधिंची उभी ही विरही राधा
बावरते मनिं पुन्हां पुन्हां
घागर माझी राही रिकामी यमुनेला ३

गायिका : शांता आपटे

## तुझ्या नि माझ्या संसारीं : ३८

ती – तुझ्या नि माझ्या संसारीं सजला रंगमहाल
तो – राजा-राणी आनंदें राहूं त्यांत खुशाल ॥ध्रु०॥
ती – गडे उठा ना ? राजासाठीं राणी देइ चहा
तो – नको कपांतिल दे ओठांतिल अमृततुल्य चहा
ती – इश्श ! काय ही भलत्या वेळीं
भलतिच बाई चाल १

चलायचं ना जेवायाला स्वयंपाकहि झाला
उद्यां तारीं जेवुनि जागिन गृहिणीधर्माला
तो – खाणावळिच्या मिष्टान्नाचे चुकले माझे हाल २
स्वारी निघाली राजाची ही बघ ऑफिसामाजी
ती – संध्याकाळीं लावुन डोळे पाहिन वाट तुझी
तो – येतांक्षणिं रंगवील राजा गालीं संध्याकाळ ३

कांहीं दिसांनीं आपुल्या महालीं पाळणा हालेल
ती – वात्सल्यानीं राणीचा रे रोमरोम नाचेल
बाळाला अंगाई गाइन सांज सकाळ ४

गायक : शांता आपटे व पंडितराव नगरकर

## शुभमंगल झालें : ३९

शुभमंगल झालें आपुलें
सात पावलें संगतीं तुझ्या
आज प्रिया चाललें ॥ ध्रु० ॥

गौरिहार पूजियला भक्तीनें अन्तरीं
असाच लाभो पती सातां जन्मांतरीं
लेणें मंगळसूत्राचें तुझ्यामुळें लाभलें १

आनंदाश्रुंनीं भिजल्या मुंडावळी
मंगलाक्षतांनीं भान हरपलें मुळीं
अंतरपाट होता दूर जीवन हें वाहिलें २

माहेर आज मी तुजसाठीं सोडिलें
सासरीं तुजसवें पाऊल घातलें
दृष्ट न लागो सौभाग्या होवो रे घर भरलें ३

गायिका : शांता आपटे

## मुशाफिरा रे : ४०

तो – मुशाफिरा ही दुनिया सारी
घडीभराची वस्ती रे
ती – नसे महालीं ख्यालिखुशाली
ती तर रस्तोरस्तीं रे ॥ ध्रु० ॥

तो – लावुं नको रे हात कपाळीं
ती – तुझी रिकामी राहिल झोळी
तो – सुखदुःखाशीं हंसून खेळून
मुशाफिरा कर दोस्ती रे १

ती – रोख आजला उद्यां उधारी
तो – ऐसी भय्या दुनिया दारीं
ती – कधीं गिरस्ती कधीं फिरस्ती
झूट धनाची मस्ती रे २

आज अमिरी उद्यां फकिरी
तो – कुठेंहि भय्या टाक पथारी
आलास नंगा जाशिल नंगा
तुझी खुदाला धास्ती रे ३

गायक : वसंत देशपांडे व अलका

# कांहीं भावगीतांच्या विषयाविषयीं

## दारिंच्या देवळींत

माझे मित्र रॉय किणीकर यांना माझें 'निरांजन पडलें' हें काव्य अतिशय आवडलें. 'त्या काव्यांतील मातेच्या मनस्थितीप्रमाणें, जिचा पति दूर गेला आहे अशा एखाद्या पत्नीच्या मनस्थितीचं वर्णन करणारं एखादं काव्य लिहा' असं त्यांनींच मला सुचवलं. या विषयावर विचार करतां-पति दूर गेल्याचं काव्यात्मक कारण सांपडेना. 'परक्यांनीं' उभारलेल्या युद्धांत एखाद्या स्वकीय पतीला खेंचणं मला बरं वाटेना. त्या दिवसांत ४२ चे एक भूमिगत कार्यकर्ते बरेच दिवस प्रगट न झाल्यामुळें त्यांच्या अस्तित्वासंबंधीं जनतेला हुरहूर लागून राहिली होती. शेवटीं याच भूमिगताच्या पत्नीच्या दृष्टिकोणांतून किणीकरांनीं सुचवल्याप्रमाणें हें काव्य लिहिलें. या काव्याचं कुणाला रत्नाप्पा कुंभारांच्या त्या वेळच्या अवस्थेशीं साम्य वाटलं तर तें मी नाकारणार नाहीं.

## निरांजन पडलें —

'रामशास्त्री' बोलपट पाहिल्यानंतर, 'आनंदीबाईच्या शेल्यांनीं गंगाबाईच्या कपाळाचं कुंकू पुसल्याचं आणि तिच्या हातांतल्या ओंवाळणींतलं निरांजन पडल्याचं' दृश्य माझ्या मनांत बरेच दिवस घर करून राहिलं होतं. मनाच्या याच

अवस्थेंत एके दिवशीं माझा एक मित्र युरोपच्या समरांगणा-वर 'कामास आल्या' ची दुःखद वार्ता समजली. त्या वार्तेची वरील दृश्याशीं सांगड घालून हें काव्य तयार झालं. हें काव्य ऐकतांना जेव्हां अनेक श्रोत्यांच्या डोळ्यांतून घळ-घळां अश्रू वाहात असल्याचे मला दिसत तेव्हां माझ्या डोळ्यांसमोर एक चित्र नेहमींच उभं राही. 'यु. टी. सी. कँपवर रात्रींच्या शांत वेळीं आमच्या तंबूंत येऊन, तो देखणा, तरतरीत हळव्या मनाचा बाळ फिडल्च्या तारा छेडून भोंवतालचं वातावरण तरलतेनं भारावून टाकीत आहे' हें तें चित्र.

या काव्याला एक इतिहास आहे. प्रथम एका दिवाळी अंकांत हें काव्य छापून आलं. दिवाळी अंकांत या विषयावर काव्य यायला नको होतं असा एका सुप्रसिद्ध साप्ताहिकानं शेरा मारला. पण ज्या त्या काळाची, यथार्थ परिस्थिति आपल्या काव्यांत उमटवणं हेंच कवीचं कर्तव्य नाहीं काय ?

## नभोवाणी – गायिकेस ( भावगीत ऐकिलें )

कोणा एका भावगीत – गायिकेचं एकदां नभोवाणीवरून मी एक 'भावगीत ऐकलं.' गोड गळ्यांतून निघालेलं तें भावपूर्ण शब्दसंगीत ऐकून मी मोहित झालों. तें एक विरह – गीत होतें. आणि, 'मन्मनास जिंकिलें, जरि तुला

न पाहिलें ' ही शेवटची ओळ झट्कन् मनांत तयार झाली. नंतर, ' ती गायिका स्वतःचीच मनस्थिति गायिली असेल काय ? ' अशा विचारांनीं हें काव्य लिहिलं.

**कां नाहीं हसलां नुसतें ?**

एका युवतीचं एका युवकावर मन गेलं होतं. पण तिनं तें त्याला सांगितलं नव्हतं. तो कीर्तीच्या मागें लागला होता. ती त्याच्या मागें होती. शेवटीं दोघं दोन दिशेला गेलीं. शेवटपर्यंत हें त्याला कळलं नव्हतं. मला तें कळलं न् हें काव्य झालं.

**हलके हलके चाल राधे**

माझे परम मित्र मनमोहन यांचा 'अंबाडा' ऐकलं न् राधेला असा उपदेश करण्याची जरूरी भासली.

**तिचं पत्र**

हें दृश्य मी स्वतः पाहिलेलं आहे. मात्र 'पुढच्या ओळी तुडवणार का कुणास पायदळीं ? ' ही कविकल्पना.

**मोडेनही परंतु–**

' I will Break – but not Bend ' हें इब्सेनच्या नोराचं वाक्य मला फार आवडतं. निराळ्या दृष्टीनं माझे मित्र पु. भा. भावे यांची ' विषकन्या ' अशीच होती. त्या नाटकासाठींच हें पद लिहिलें.

## कशाला येतां नेताजी ?

